RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक १११] बुधवार, सप्टेंबर २, २०२६/भाद्रपद ११, शके १९४८ [पृष्ठे ७, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ३७७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### कामगार विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मुंबई ४०० ०३२, दिनांक २ सप्टेंबर २०२६.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेप्रनि-२०२२/प्र.क्र.१९९/कामगार-८.— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि अस्तित्त्वात असलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमित करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाच्या अधिपत्याखालील कामगार आयुक्त यांच्या कार्यालयातील " दुकाने निरीक्षक श्रेणी-१ व दुकाने निरीक्षक श्रेणी-२", गट-क या पदावरील सेवा प्रवेशाचे विनियमन करण्यासाठी याद्वारे पुढील नियम करीत आहे ते असे :-

**१. संक्षिप्त नाव, प्रारंभ :—**

१. या नियमांना कामगार आयुक्त कार्यालयातील "दुकाने निरीक्षक श्रेणी-१ व दुकाने निरीक्षक श्रेणी-२", गट-क सेवाप्रवेश नियम, २०२६ असे संबोधण्यात यावे.

२. सदर नियम शासन **राजपत्र** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. व्याख्या —** या नियमांमध्ये संदर्भानुसार अन्यथा दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,-

(क) " नियुक्ती प्राधिकारी " याचा अर्थ, शासकीय सेवेतील "दुकाने निरीक्षक श्रेणी-१ व दुकाने निरीक्षक श्रेणी-२", गट-क या पदावर नियुक्ती करण्यासाठी सक्षम असणारा " कामगार आयुक्त " हा प्राधिकारी असा आहे ;

(ख) " आयुक्तालय " याचा अर्थ कामगार विभाग या प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील कामगार आयुक्तालय असा आहे ;

(ग) " पदोन्नतीसाठीची पात्रता" याचा अर्थ, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी यासंदर्भात निर्गमित केलेले नियम, शासन निर्णय किंवा आदेशाद्वारे पदोन्नतीसाठी विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार पदोन्नतीसाठीची पात्रता असा आहे ;

(घ) " पदवी " याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता ;

(च) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे ;

(छ) " आयोग " याचा अर्थ महाराष्ट्र लोकसेवा आयोग असा आहे.

**३. दुकाने निरीक्षक श्रेणी-१, गट-क या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल.**

आयुक्तालयातील दुकाने निरीक्षक श्रेणी-१ (गट-क) या पदावर नियुक्ती ही आयुक्तालयातील दुकाने निरीक्षक श्रेणी-२, (गट-क) हे पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या व्यक्तींमधून पदोन्नतीसाठीची पात्रता या निकषावर योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने.

**४. दुकाने निरीक्षक श्रेणी-२, गट-क या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल.**

**(क) पदोन्नतीने नियुक्तीचा मार्ग—**

लिपिक-टंकलेखक, गट-क हे पद धारण करणाऱ्या व दुकाने निरीक्षक श्रेणी-२ या पदावर पदोन्नती देण्याचा विकल्प दिलेल्या आणि लिपिक-टंकलेखक या पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या आणि खंड (ख) च्या उपखंड (दोन) येथील शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या व्यक्तींमधून पदोन्नतीसाठीची पात्रता या निकषावर, आणि लिपिक-टंकलेखक संवर्गातील पदवीधरांची राज्यस्तरावर (कामगार आयुक्तालय) ठेवण्यात येत असलेल्या स्वतंत्र ज्येष्ठता यादीतील योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने.

परंतु, सदर विकल्प संबंधित निवडसूची वर्षाकरिता राहील व तद्‌नंतरच्या निवडसूची वर्षाकरिता पुन्हा नव्याने विकल्प देणे आवश्यक राहील."

किंवा

**(ख) नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीचा मार्ग—**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे.

**(एक) वयोमर्यादा-**

दुकाने निरीक्षक श्रेणी-२, गट-क या पदासाठी खालीलप्रमाणे आवश्यक राहील.

(एक) किमान वयोमर्यादा- सदर पद भरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास १८ वर्ष पूर्ण असावे.

(दोन) कमाल वयोमर्यादा- सदर पद भरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास अमागास प्रवर्गातील व्यक्तींचे वय ३८ वर्ष पूर्ण पेक्षा अधिक नसावे आणि मागास प्रवर्गातील व्यक्तींचे वय ४३ वर्ष पूर्ण पेक्षा अधिक नसावे.

(तीन) वयोमर्यादेची गणना- जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास, उपरोक्त प्रमाणे नमूद केलेली किमान व कमाल वयोमर्यादा धारण केलेली असणे आवश्यक राहील.

**(दोन) शैक्षणिक अर्हता-**

सांविधिक विद्यापीठातील कोणत्याही विद्याशाखेची किमान पदवी किंवा शासनाने तिच्याशी समतुल्य असल्याचे घोषित केलेली अन्य कोणतीही शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

**५.** नियम ३ व ४ येथे नमूद केलेल्या पदावरील नियुक्त्या या नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने करण्यात येतील.

**६. नियुक्ती मार्गानुसार नियुक्तीचे प्रमाण :—**

नियम ४ येथे नमूद केलेल्या पदाच्या एकूण मंजूर पदसंख्येसाठी, पदोन्नतीने व नामनिर्देशनाने नियुक्ती देण्याचे प्रमाण हे अनुक्रमे ५०:५० असे राहील;

**७. हिंदी व मराठी भाषा परीक्षेबाबतची तरतूद :—**

(क) नियम ३ व ४ येथे नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, पदोन्नतीपूर्वी हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसंदर्भात मराठी भाषा विभागाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेली असणे अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील. अन्यथा नियम ३ येथील पदावर पदोन्नती अनुज्ञेय ठरणार नाही.

(ख) नियम ४ येथे नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसंदर्भात मराठी भाषा विभागाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण केलेली नसेल अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली नसेल तर, नियुक्तीनंतर संबंधित नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहित मुदतीत हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

**८. संगणक अर्हता प्रमाणपत्राबाबतची तरतूद :—**

(क) नियम ३ व ४ येथील पदावर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, पदोन्नतीपूर्वी संगणक अर्हता प्रमाणपत्रासंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार, संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण करणे अथवा सामान्य प्रशासन विभाग (माहिती व तंत्रज्ञान) यांनी वेळोवेळी शासन आदेशाद्वारे नमूद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी शासन आदेशानुसार निश्चित केलेल्या वयोमर्यादेनुसार संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील. अन्यथा नियम ३ येथील पदावर पदोन्नती अनुज्ञेय ठरणार नाही.

(ख) नियम ४ येथील पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, संगणक अर्हता प्रमाणपत्रासंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार, नियुक्तीपूर्वी संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण केलेले नसल्यास, याबाबतच्या नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत सदर प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. त्याप्रमाणे विहित मुदतीत प्रमाणपत्र धारण न केल्यास सदर संगणक प्रमाणपत्र धारण करेपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

**९. लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापनाबाबतची तरतूद :—**

(१) नियम क्र. ४ येथील पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील तरतुदींनुसार व त्याबाबत वेळोवेळी करण्यात येणाऱ्या नियमांनुसार, नियुक्तीच्या वेळी लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक राहील.

(२) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापनामध्ये जर अपत्यसंख्या दोन पेक्षा अधिक असल्याचे नमूद केल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधित उमेदवार शासकीय नियुक्तीसाठी अपात्र राहील.

(३) एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, जर नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर त्याला दोनपेक्षा जास्त अपत्ये असल्याचे सिद्ध झाले, तर ती व्यक्ती शासन सेवेकरिता अनर्ह राहील.

**१०. बदलीबाबतची तरतूद :—**

नियम ३ व ४ येथील पदावर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तींची सेवाज्येष्ठता यादी ही राज्य स्तरावर ठेवण्यात येईल. त्यामुळे सदर व्यक्ती ही महाराष्ट्रात राज्य स्तरावर बदलीसाठी पात्र राहील.

**११. शासकीय सेवेत प्रवेश केल्यानंतर सेवाविषयक अन्य आदेश/नियम लागू होतील :—**

शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर राज्य शासनाच्या वतीने शासन आदेशाद्वारे निश्चित केलेल्या अटी व शर्ती संबंधितांस लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**आय. ए. कुंदन,**
शासनाचे अपर मुख्य सचिव (कामगार).

## LABOUR DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, dated the 2nd September 2026.

*NOTIFICATION*

Constitution of India.

No. Seprani-2022/C.R.199/Labour-8.—In exercise of the powers conferred by the proviso to Article 309 of the Constitution of India, and in supersession of all the existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following Rules regulating recruitment to the post of Shop Inspector Grade-I and Shop Inspector Grade-II (Group-C), in the Office of Commissioner of Labour under the administrative controal of the Labour Department of Government of Maharashtra, namely :—

**1.** These rules may be called " The Shop Inspector Grade-I and Shop Inspector Grade-II (Group-C) (Recruitment) Rules, 2026.

**2.** In these rules, unless the context requires otherwise, —

(a) "Appointing Authority" means the Commissioner of Labour in relation to the posts of Shop Inspector Grade-I and Shop Inspector Grade-II (Group-c) ;

(b) "Commissionerate" means Labour Commissionerate under the administrative control of the Labour Department ;

(c) "Eligibility for promotion" means eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified for promotion by the rules, resolutions or orders issued by the General Administration Department of the Government, from time to time ;

(d) "Degree" means degree of any discipline of a statutory university or any qualification declared by the Government to be equivalent thereto ;

(e) "Government" means the Government of Maharashtra ;

(f) "Commission" means the Maharashtra Public Service Commission.

**3.** Appointment to the post of Shop Inspector Grade-I (Group-C) in the Commissionerate shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Shop Inspector Grade-II (Group-C) in the Commissionerate and having not less than three years regular and continuous service on the said post.

**4.** Appointment to the post of Shop Inspector Grade-II (Group-C) in the Commissionerate shall be made either,—

(a) by promotion of a suitable person who have opted for promotion to the said post and by promotion of suitable persons from the separate seniority list of graduates in the Clerk-Typist (Group-C) cadre maintained at the state level (Commissionerate) and having not less than three years regular and continuous service on the said posts alongwith minimum educational qualification as mentioned in sub-clause (ii) of clause (b) :

Provided that, the separate seniority list of Clerk-Typist who have opted for promotion to the post of Shop Inspector Grade-II (Group-C) is valid only for a concerned selection list year. It is necessary to prepare a fresh list of seniority on the basis of options given by Clerk-Typist for that particular year, or

(b) Through nomination from among the candidates recommended based on the results of the competitive examination conducted by the Maharashtra Public Service Commission.

(i) Age limit :—

| | | |
|---|---|---|
| (A) | Lower Age Limit | Not less than eighteen years of age as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the said post. |
| (B) | Upper Age Limit | Not more than thirty-eight years of age for the persons not belonging to reserved categories and not more than forty-three years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the said post. |

(ii) Minimum Educational Qualification- A candidate possess a degree.

**5.** Appointment to the post mentioned in rules 3 and 4 shall be made with the approval of Appointing Authority.

**6.** Appointment to the post mentioned in rule 4 by promotion and nomination shall be made in the ratio of 50:50, respectively.

**7.** (a) A person to be appointed to the posts mentioned in rule 3 and 4 by promotion shall pass the Marathi and Hindi languages examination as per the rules made in this behalf by the Government, from time to time unless he has already passed or has been exempted from passing those examinations, before getting promoted to the said post.

(b) A person appointed to the posts mentioned in rule 4 by nomination shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in this behalf by the Government, from time to time within the prescribed time limit after appointment, unless he has already passed or has been exempted from passing those examinations. He shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he passes those examinations.

**8.** (a) A person to be appointed to the posts mentioned in rule 3 and 4 by promotion shall possess a Certificate of Computer Operations prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he already possess such Certificate or has been exempted therefrom, before getting promoted to the said post.

(b) A person appointed to the post mentioned in rule 4 by nomination shall possess a Certificate of Computer Operations prescribed by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he already possessed or has been exempted from possessing such Certificate, otherwise, he shall not be eligible for annual increment or promotion to the next promotion post until he possesses the same.

**9.** (1) A person recommended for appointment by nomination to the post mentioned in rule 4 shall submit a declaration of Small Family as per the provision of the Maharashtra Civil Services (Declaration of Small Family) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time.

(2) A person having more than two children on the date of submission of Declaration of small family shall be disqualified for the appointment in Government Service.

(3) After appointment of a person in the Government service, if it is proved that he has more than two children at the time of appointment or thereafter, then he shall be disqualified for continuing on the said post in the Government service.

**10.** Person appointed to the post mentioned in Rules 3 and 4 shall be liable to the transferred anywhere in the State of Maharashtra, as a seniority list of the said posts is maintained at State level.

**11.** The terms and conditions specified by the Government, in any rules, or resolution issued by the Government from time to time, before or subsequent to the appointment of any Government Servant shall also be applicable to the concerned Government Servant.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

I. A. KUNDAN,
Additional Chief Secretary to Government (Labour).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.